**"डिसेंबर २०१९" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती ...**

**(क) मंत्रालयीन संवर्गातील अधिकारी / कर्मचारी यांची बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल / कार्यमुक्त / प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन / पदोन्नती / पदावनती / मानीव दिनांक व नियमित दिनांक इत्यादींच्या आदेशांचा तपशील ...**

- भारतीय प्रशासन सेवा संवर्गातील १३ अधिकाऱ्यांची बदली करण्यात आली आहे.
- उपसचिव-१, उच्चश्रेणी लघुलेखक-२ अशा ३ अधिकारी / कर्मचाऱ्यांची बदली करण्यात आली आहे.
- सहसचिव-१, उपसचिव-२, अवर सचिव-८, कक्ष अधिकारी-१, सहायक कक्ष अधिकारी-१, वरिष्ठ स्वीय सहायक-१, उच्चश्रेणी लघुलेखक-१ अशा एकूण १५ अधिकारी / कर्मचाऱ्यांचे प्रत्यावर्तन करण्यात आले आहे.
- उच्चश्रेणी लघुलेखक संवर्गातील एका कर्मचाऱ्यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे.

**(ख) शासन निर्णय / अधिसूचना**

- दिनांक ३ डिसेंबर २०१९ च्या शासन निर्णयान्वये यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी, पुणे या संस्थेमार्फत महाराष्ट्र धोरण संशोधनाच्या विविध बाबींवर सन २०१९-२० या वर्षात झालेल्या कार्यालयीन खर्चाकरिता रु.३५.०० लाख इतक्या रकमेस काही अटींच्या अधीन प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन, सहायक अनुदान वितरित करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

- दिनांक ११ व १३ डिसेंबर २०१९ च्या शासन निर्णयान्वये अ.भा.से. (कार्य मुल्यांकन अहवाल) नियम २००७ प्रामणे सन २०१९-२० मध्ये भारतीय प्रशासन सेवेतील महाराष्ट्र राज्य संवर्गातील दिनांक ३१ मार्च २०१९ रोजी ४० वर्षे किंवा अधिक वय असलेल्या अधिकाऱ्यांनी करुन घ्यावयाच्या वैद्यकीय तपासणीबाबत सूचना निर्गमित केल्या आहेत.

- दिनांक १६ डिसेंबर २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये महाराष्ट्र राज्य संवर्गातील भारतीय प्रशासन सेवेतील सर्व अधिकाऱ्यांनी सन २०१९ ची वार्षिक अचल मालमत्ता विवरणपत्रे (IPR) Online पद्धतीने सादर करण्याबाबत कार्यपद्धत विहित केली आहे.

- दिनांक २६ डिसेंबर २०१९ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांकरिता यशदा, पुणे व वनामती, नागपूर या प्रशिक्षण संस्थांकरिता मंजूर असलेल्या विविध संवर्गातील ९ पदांच्या पदनामात व वेतनश्रेणीत बदल करुन पदसंरचनेच्या बदलास आणि सदर पदांची वेतनश्रंणी अवनत करुन सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणीत बदल करण्यात आला आहे.

**(ग) प्रशिक्षण / परीक्षा**

- दिनांक २४ डिसेंबर २०१९ च्या शासन पत्रान्वये राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत कक्ष अधिकारी, गट-ब मधील ४४ अधिकाऱ्यांसाठी उजळणी प्रशिक्षण वर्ग कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने), सांगली या संस्थेमार्फत दिनांक ६ ते १० जानेवारी २०२० पर्यंत आयोजित करण्यात आले आहे.

- दिनांक २४ डिसेंबर २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन विभागातील लिपिक-टंकलेखक सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा २०१९ चा ३६५ उमेदवारांचा निकाल जाहिर करण्यात आला आहे.

**(घ) ज्येष्ठतासूची**

- दिनांक १० डिसेंबर २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये कक्ष अधिकारी पदावर पदोन्नतीसाठी पात्र सहायक कक्ष अधिकारी यांची दिनांक १ जानेवारी २०१९ रोजीची अंतरिम सामायिक ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.

*****